जा.क्र. 5902/2017

धर्मादाय आयुक्त भवन,
३रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दुरध्वनी क्रमांक २४९३५४३४ २४९३५४९०
फॅक्स २४९७६४२०

13 NOV 2017

**परिपत्रक क्र.** 518 **दिनांक** 13/11/2017

या परिपत्रकाद्वारे सर्व अधिकाऱ्यांना आदेशित करण्यात येते की, सर्व अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील धार्मिक स्थळे, मंदीरे, मस्जिद, दर्गा, गुरुद्वारा व चर्च ज्यांची नोंदणी केलेली नसेल, अशा धार्मिक स्थळांची नोंदणी करुन घ्यावी. अनेक गावांमध्ये मंदीरे, दर्गा उभारलेले आहेत. परंतु सदरील धार्मिक स्थळांची नोंदणी धर्मादाय कार्यालयाकडे केलेली नाही. त्यामुळे सदरील गावांच्या सरपंच किंवा ग्रामसेवक अथवा तहसीलदार यांच्या मार्फत माहिती मागवून सदरील धार्मिक स्थळांची नोंदणी करुन घ्यावी. अनेक मंदीरे, दर्गा, गुरुद्वारा, चर्च यांच्याकडे स्थावर मालमत्ता म्हणजेच जमीनी आहेत. परंतु त्यांची देखभाल योग्य प्रकारे होत नाही अथवा त्यांचे उत्पन्न देवस्थानांना मिळत नाही. त्यामुळे देवस्थानांचे नुकसान होत आहे. त्याचबरोबर देवस्थानांच्या जमिनी या धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या परवानगीशिवाय विकल्या आहेत किंवा कसे या बाबतचीही चौकशी करावी व त्यात दोषी आढळणाऱ्यांवर फौजदारी कार्यवाही करावी. अनेक ठिकाणी देवस्थानांचे उत्पन्न कमी आहे, हे उत्पन्न कमी का आहे? पुजारी व इतर लोक उत्पन्न घेत आहेत का? याबाबत चौकशी करावी. देवस्थानांचे लाभार्थी हे देवस्थानांचे विश्वस्त होऊ शकत नाहीत या संदर्भात देवस्थानांच्या योजनेमध्ये योग्य ते बदल करुन योग्य व्यक्तींच्या देवस्थानांचे विश्वस्त म्हणुन नेमणुका कराव्यात व देवस्थानांचे उत्पन्न कसे वाढेल व भाविकांना सोयीसुविधा कशा मिळतील याबाबत निर्णय घ्यावेत. देवस्थानच्या जमिनीवर

अतिक्रमणे झाली असल्यास, विश्वस्तांनी अतिक्रमणे रोखण्यासाठी काय प्रयत्न केले हे पहावे व त्यांनी काहीच प्रयत्न केले नसल्याचे आढळल्यास सदरील विश्वस्तांविरुध्द कार्यवाही करावी. त्याचबरोबर सर्व धर्माच्या देवस्थानांच्या निधीचा उपयोग सामाजिक कामासाठी कसा करता येईल याकरीता आवश्यक ती कार्यवाही करावी. यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास पाठवावा.

(शि.ग.डिगे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१. परिपत्रक धारिणी
२. सर्व धर्मादाय सह आयुक्त
३. सर्व धर्मादाय उप आयुक्त
४. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त